क्र. ५१८५/म.वि.स./'य'
दि. ०८ फेब्रुवारी २०२३

# :: परिपत्रक ::

विषय - **या सचिवालयातील सर्व कक्षांत संगणकावर मराठी भाषेमध्ये टंकलिखित होणारी सर्व कागदपत्रे 'कोकिळा (Kokila)' या टंकामध्ये (font) टंकलिखित करण्याबाबत व मंत्रालयीन विभागांकडून प्राप्त होणारी माहिती 'सकल मराठी (Sakal Marathi)' याच टंकामध्ये प्राप्त करून घेण्याबाबत.**

मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८ मे २०२२ रोजी कार्यवाही संपादन कक्ष, ग्रंथालय कक्ष, संगणक कक्ष तसेच शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई येथील अधिकारी यांच्या समवेत आयोजित बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार या सचिवालयातील सर्व कक्षांत संगणकावर मराठी भाषेमध्ये टंकलिखित होणारी सर्व कागदपत्रे 'कोकिळा (Kokila)' या टंकामध्ये (font) मध्ये टंकलिखित करण्यात यावीत असा निर्णय झालेला आहे. सदर निर्णयाला माननीय पीठासीन अधिकाऱ्यांची देखील मान्यता प्राप्त असून तदनुसार एमकेसीएल (MKCL) या संस्थेच्या अभियंत्यांनी देखील सचिवालयातील विविध कक्षांत वापरल्या जाणाऱ्या आज्ञावल्यांमध्ये (programs) 'कोकिळा (Kokila)' या टंकात टंकलेखन होईल अशा सुधारणा केलेल्या आहेत. त्याचबरोबर मंत्रालयीन विभागांनी या सचिवालयातील विविध कक्षांना पाठवावयाची माहिती ही 'सकल मराठी (Sakal Marathi)' या टंकात टंकलिखित करून पाठवावी असाही निर्णय सदर बैठकीत झालेला आहे. **उक्त निर्णय दि. ३० मे २०२२ रोजी उपरोक्त विषयी मान्य झालेली टिप्पणी या सचिवालयातील सर्व कक्षांना माहितीस्तव वितरित करण्यात आलेली आहे. (सोबत संदर्भासाठी प्रत जोडलेली आहे.)**

सदर निर्णय या सचिवालयात टंकलिखित व मुद्रित होणाऱ्या सर्व कागदपत्रांमध्ये एकरूपता येण्याच्या दृष्टीने तसेच शासकीय मुद्रणालयाला विधिमंडळाकडून जाणाऱ्या सर्व कागदपत्रांवर त्यांच्या संगणकांमार्फत मुद्रणसंस्कार करताना सुलभता येण्याच्या दृष्टीने घेण्यात आलेला आहे.

तथापि या सचिवालयाच्या 'फ' कक्षाने त्यांच्या टिप्पणी क्र. २५/२०२३ द्वारे त्यांच्याकडे विधिमंडळाच्या विविध कक्षातून प्राप्त होणारे पत्रक भाग दोन संबंधीचे मसुदे वेगळ्या फॉन्टमध्ये टंकलिखित करून पाठवले जात असल्याकडे लक्ष वेधले आहे. तसेच काही कक्ष एका विवक्षित फॉन्टचाच आग्रह धरीत असल्याचेही 'फ' कक्षाने निदर्शनास आणून दिलेले आहे.

वरील बाबी या उपरनिर्दिष्ट निर्णयाला बाधक असून सदर निर्णयाचे उल्लंघन देखील करत असल्यामुळे सर्व संबंधित कक्षांना याद्वारे असे पुनर्सूचित करण्यात येत आहे की, उपरोल्लिखित बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार या सचिवालयातील सर्व कक्षांत संगणकावर मराठी भाषेमध्ये टंकलिखित होणारी सर्व कागदपत्रे 'कोकिळा (Kokila)' या टंकामध्येच (font) मध्ये टंकलिखित करण्यात यावीत व कक्षांनी इतर कोणत्याही फॉण्टचा आग्रह धरू नये. तसेच मंत्रालयीन विभागांकडून प्राप्त होणारी माहितीदेखील 'सकल मराठी (Sakal Marathi)' याच फॉन्टमध्ये पुरविली जात आहे याबाबत खातरजमा करून घ्यावी.

(अजय अग्रवाल)
**कार्यवाही संपादक**

**प्रतिलिपी -**

१) माननीय प्रधान सचिवांचे कार्यालय

२) सर्व माननीय पीठासीन अधिकाऱ्यांची कार्यालये

३) या सचिवालयतील सर्व अधिकारी व कक्ष